श्री. खु. वा. हराळ, शाखा अभियंता
यांना पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्र. मुविनि-२०१६/प्र.क्र.१११/ऊर्जा-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-११ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u> :- (१) शासन निर्णय क्र. मुविनि-२०१६/प्र.क्र.१११/ऊर्जा-५ दि. १५/११/२०१७.
(२) मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालयीन आदेश क्र. २५६९/ सन २०१७ दि. १६/११/२०१७.

शासन आदेश :-

श्री. खुशाल वामनराव हराळ, शाखा अभियंता यांनी त्यांची सेवा ऊर्जा विभागात राहू देण्याबाबत दि. ०२/०५/२०१७ रोजी केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने त्यांचे सार्वजनिक बांधकाम विभागात केलेले समावेशन संदर्भाधिन शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आले आहे. श्री. हराळ, शाखा अभियंता यांना सार्वजनिक बांधकाम विभागातून ऊर्जा *विभागात* रुजू होण्याकरिता संदर्भ क्र. २ अन्वये कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन श्री. हराळ, शाखा अभियंता यांचे ऊर्जा विभागात समावेशनानंतर पदस्थापना खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अनु.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	पदस्थापनेचे ठिकाण
१.	श्री. खुशाल वामनराव हराळ, शाखा अभियंता	विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालय

२. श्री. हराळ यांनी सदर पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे.

३. मुख्य विद्युत निरीक्षक यांनी श्री. हराळ, शाखा अभियंता हे पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर त्यांचा सेवाभिलेख मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागवून घ्यावेत.

४. उपरोक्त आदेश मुख्य विद्युत निरीक्षक यांनी संबंधित अधिकाऱ्याच्या निर्दशनास आणावे व वरील आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

५. तसेच या आदेशान्वये करण्यात आलेल्या पदस्थापनेमध्ये बदल करण्यासाठी राजकीय दडपण/ दबाव आणल्याचे निर्दशनास आल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अनुसार शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात येईल.

६. हा शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४१११५३३००२०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.04.11 15:34:58 +05'30'

(भि.य.मंता)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (सा.बां.) यांचे खाजगी सचिव

४) मा. मंत्री(ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
६) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, विधानभवन, मुंबई
७) सर्व विधानसभा / विधान परिषद सदस्य , महाराष्ट्र राज्य
८) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (सा.बां.वि.), मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा)महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ०२०
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
१३) अधिदान व लेखा अधिकारी, (अराप/रालेवि-१), मुंबई
१४) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१५) निवासी लेखाधिकारी, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६) मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां.वि. मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
१७) मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, तिसरा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू) मुंबई-४०० ०७१
१८) अधिक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, मुंबई/नागपूर/औरंगाबाद/पुणे
१९) श्री. खु. वा. हराळ, शाखा अभियंता यांना मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, तिसरा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू) मुंबई-४०० ०७१ यांचेमार्फत.
२०) निवड नस्ती- ऊर्जा-५.